दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
वर्ष : ०४, अंक : २०७
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com
बुलडाणा, रविवार, दि.०९ मार्च २०२५

।।सुविचार।।
कोणाच्याही सावलीखाली उभा राहिल्यावर स्वतःची सावली कधीच निर्माण होत नाही.
**स्वतःची सावली निर्माण करण्यासाठी स्वतः उन्हात उभे रहावे लागते.**

## थोडक्यात

### कल्याण पूर्व, पुणे लिंक रोडवर भीषण अपघात



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.८, कल्याण (ठाणे) :** आज दि.८, दुपारच्या सुमारास दोन रेडी मिक्सर डंपरने अनेक वाहनांना धडक दिली व मोठा अपघात घडला आहे. अपघातात ३ जण जखमी आहेत त्यापैकी एकाची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते.

अग्निशमन दलाने अडकलेल्या वाहनचालकाला सुखरूप बाहेर काढले, तर एका जखमी व्यक्तीला रुग्णालयात दाखल केले आहे. या आधीही या ठिकाणी अनेक अपघात घडले असून प्रशासनाकडून कुठलीही काळजी न घेतल्याची नागरिकांची टीका आहे..

यावर जर उपाय योजना होत नसतील तर, प्रशासन काय कुणाचा जीव जाण्याची वाट बघत आहे का ? असा सवाल येथील नागरिक करत आहे.

### महालक्ष्मी गडाच्या डोंगराला वनवा लागल्याने गडावरील दुकाने जळून खाक

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०८, डहाणू (पालघर) :** डहाणू तालुक्यातील पूर्वेकडे मोठ्या प्रमाणत लहान मोठे डोंगर, टेकड्या आहेत. यामध्ये अनेक औषध वनस्पती सह , अन्य जंगली झाडे असून रानटी प्राण्याचा ही वावर आहे. मात्र उन्हाळा सुरु होताच झाडांचा पाला पाचोळा पडला असून हाच पाला पाचोळा जाळून प्राण्याची शिकार करण्यासाठी शिकारी डोंगरांमध्ये आगी लागण्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे दिसत आहे.

काही दिवसांपूर्वी साये,उर्से आदी डोंगराना वनवा लागुन मोठ्या प्रमाणत जंगल जळून खाग झाले होते, तर दोनच दिवसांपूर्वी तालुक्यातील वाघाडी येथील ससाली डोंगराला आग लावली होती. डोंगराला वनवा लागण्याच्या घटना सतत घडतं असून डहाणू तालुक्यातील प्रसिद्ध महालक्ष्मी गडाला शुक्रवावरी रात्री वणवा लावला गेला होता, यामध्ये महालक्ष्मी गडावर असणारी १० ते १५ दुकाने आगीमध्ये जळून खाग झाली आहेत. यामध्ये यामध्ये पूजेचे साहित्य, तसेच प्रसादाची दुकाने होती ही पूर्णपणे जळाली असून दुकानदारांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे.यामुळे पर्यावरणप्रेमी, तसेच स्थानिक नागरिकांकडून रोष व्यक्त केला जात आहे. मात्र याबाबत वनविभाग हा उदानीन दिसत आहे. तर शिकारी च्या उद्देशाने जंगलाला आग लावणाऱ्या शिकाऱ्यावर अंकुश लावणे गरजेचे आहे. सततच्या डोंगराना आग लागत असणाल्यामुळे नैसर्गिक वनसंपदा नष्ट होत आहे. त्यामुळे वनविभागाने जंगल परिसरात गस्त देण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

महालक्ष्मी गडाच्या पायथ्याशी अज्ञातानी शिकारीच्या उद्देशाने आग लावली असेल, ही आग रात्री च्या गडावरील दुकांना लागून यामध्ये १५ते २० दुकाने जळाली आहेत.यामुळे दुकानदारांचे आर्थिक नुकसान झाले आहे. डोंगराना वनवा लावणाऱ्यावर वनविभागाने कारवाई करावी

**दिनेश बोलाडा -सामाजिक कार्यकर्ते**

# ‘सीसीआय’च्या कापूस खरेदी केंद्रावर ५० कोटींचा भ्रष्टाचार?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०८, अकोला :** भारतीय कापूस निगमच्या अकोट व चोहट्टा बाजार येथील कापूस खरेदी केंद्रावर २०२४-२५ हंगामामध्ये कापसामधून निघणाऱ्या रुईमध्ये अनियमितता करून ५० कोटींपेक्षा अधिकचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप तक्रारदार डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या कार्यकारिणी परिषदेचे माजी सदस्य विनायक सरनाईक यांनी केला. याप्रकरणी सात जणांविरोधात पणन मंत्री जयकुमार रावल यांच्याकडे तक्रार करण्यात आली असून त्यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत.



शासन व भारतीय कापूस निगम ने किमान आधारभूत किमतीमध्ये शेतकऱ्यांचा कापूस खरेदी करण्याची जबाबदारी सीसीआयचे केंद्र प्रमुखासह अकोट कृषी बाजार समितीचे पदाधिकारी, संचालक, कर्मचारी व संबंधित जिनिंगधारकांवर दिली. या योजनेची अंमलबजावणी करताना खरेदीदारांनी स्वतःला आर्थिक लाभ मिळवून घेण्यासाठी कापसाच्या प्रत्यक्षात येणारा उताऱ्याची चुकीची नोंद घेत कागदपत्रे तयार करीत या हंगामात कोट्यवधी रुपयांची शासनाची फसवणूक केली, असा आरोप विनायक सरनाईक यांनी तक्रारीत केला आहे. भारतीय कापूस निगमशी जिनिंग धारकांनी केलेल्या करारानुसार ऑक्टोबर २०२४ मध्ये ३२.३५ टक्के, नोव्हेंबरमध्ये ३२.७० टक्के, डिसेंबरमध्ये ३३.१० टक्के आणि जानेवारी महिन्यात ३३.३० टक्के इतके कमीत कमी प्रमाणात कापसाच्या रुईचे प्रेसिंग करून ते सीसीआयच्या स्वाधीन करणे आवश्यक आहे. करारानुसार निश्चितीपेक्षा जास्त कापसामध्ये रुईचे प्रमाण प्राप्त झाल्यास ते सुद्धा सीसीआयकडून सुपूर्द करणे बंधनकारक होते. मात्र, त्यात अफरातफर झाल्याचा दावा तक्रारीमध्ये केला.

सद्यस्थितीत बाजार भावानुसार एक किलो रुईची किंमत सुमारे १५६ रुपये असून प्रति एक क्विंटल कापसामागे जवळपास साडेतीन किलोपेक्षा अधिक रुईची अफरातफर झाली. सीसीआयची लाखो क्विंटल कापसाची खरेदी झालेली असून यातून मोठ्या प्रमाणात रुई तयार होत आहे. त्यातही सुरुवातीला येणारा कापूस अत्यंत चांगल्या दर्जाचा असतो. त्यात रुईचे प्रमाण अधिक राहते. खरेदी मात्र ३२.३५ टक्क्यानेच या काळात केली जाते. हा प्रकार शासनाची फसवणूक करणारा असल्याचा दावा तक्रारदार विनायक सरनाईक यांनी केला. या तक्रारीची दखल पणन विभागाने घेतली असून घोटाळ्यासंदर्भात चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत.

**घोटाळ्याची व्याप्ती राज्यभर?**

सीसीआयच्या केंद्रावरील कापूस खरेदीमध्ये रुईसह इतर बाबी तपासल्या तर घोटाळ्याची व्याप्ती मोठी होऊ शकते. संपूर्ण राज्यात केंद्रावर देखील या प्रकारे घोटाळा झाला असण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी शंका देखील तक्रारदारांनी व्यक्त केली आहे.

# राज्याला वेगाने पुढे जाण्यासाठी लाडक्या बहिणींचा सरकारला पाठिंबा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०८, ठाणे :** महिलांना ज्या ज्या वेळेला संधी मिळाली, त्या त्या वेळेला त्यांनी त्यांचे कर्तृत्व दाखवून दिले आहे, असे कौतुकोद्गार काढत देशात थोर महिलांची परंपरा आहे आणि त्यांच्याकडून प्रेरणा घेऊनच अभिनव महाराष्ट्र घडत असल्याचे मत भाजप आमदार संजय केळकर यांनी व्यक्त केले आहे. महाराष्ट्र कधीही थांबणार नाही. राज्य वेगाने पुढे जाण्यासाठी लाडक्या बहिणींचा सरकारला पाठिंबा आहे, असा दावा करत केंद्र सरकार असो वा राज्य सरकार त्यांनी नेहमीच महिलांना प्राधान्य दिले असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

ठाणे येथील मावळी मंडळ शाळेत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि विविध संस्थांच्या माध्यमातून शनिवारी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ५० हून अधिक कंपन्या आणि २० हून अधिक महामंडळांचे प्रतिनिधी उपस्थित होते. याठिकाणी पाचशेहून अधिक नागरिकांनी नोकरीसाठी नोंदणी केली. या कार्यक्रमात बोलताना आमदार केळकर यांनी महिलांचे कौतुक केले.


नोकरीबरोबर कौशल्य देखील विकसित करा. सुरुवातीलाच तुम्हाला टेबल खुर्चीची नोकरी मिळणार नाही. परंतु कुठेतरी नोकरीची सुरुवात केली पाहिजे. कोणत्याही कामाची आपल्याला लाज वाटता कामा नये. जे काम मिळेल ते करून स्वतःचे विश्व निर्माण केले पाहिजे. सुरुवात करा आणि कामाला लागा. स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आपण अनेक नोकऱ्या उपलब्ध करू शकतो. ज्या ठिकाणी गरज आहे त्या ठिकाणी होतकरू तरुणांचा युवा प्रशिक्षण



योजनेत सहभागी करून त्यांना प्राधान्य द्यावे अशी मागणी शासनाकडे केली आहे, असे केळकर यांनी सांगितले. महिलांना ज्या ज्या वेळेला संधी मिळाली, त्या त्या वेळेला त्यांनी त्यांचे कर्तृत्व दाखवून दिले आहे. देशात थोर महिलांची परंपरा आहे आणि त्यांच्याकडून प्रेरणा घेऊनच अभिनव महाराष्ट्र घडत आहे. महाराष्ट्र कधीही थांबणार नाही.

राज्य वेगाने पुढे जाण्यासाठी लाडक्या बहिणींचा सरकारला पाठिंबा आहे, असेही ते म्हणाले. मल्लखांब हा अस्सल मराठी खेळ आहे. विविध आसने करू शकतो. कमीत कमी वेळात जास्तीत जास्त व्यायाम देणारा एकमेव प्रकार म्हणजे मल्लखांब. समर्थ सशक्त सुदृढ भारत निर्माण करायचा असेल तर आरोग्य चांगले कमवावे असा सल्ला पद्मश्री उदय देशपांडे यांनी तरुणांना यावेळी दिला. नोकरी मिळावी असे प्रत्येकाला वाटते. परंतु नोकरीबरोबर कौशल्य देखील अंगीकारा जेणेकरून रोजगार मिळेल असा सल्ला त्यांनी दिला. नोकरी शोधणारे हे नोकरी देणारे झाले पाहिजेत. युवकांना रोजगार उपलब्ध करून देणारा हा मेळावा हे उत्तम व्यासपीठ आहे, असे आमदार निरंजन डावखरे म्हणाले. उमेदवारांनी पगार न पाहता कुठून तरी आपल्या आयुष्याची सुरुवात होते हे पाहून नोकरी स्वीकारावी, असे जिल्हा कौशल्य रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहाय्यक आयुक्त संध्या साळुंखे यांनी सांगितले. यावेळी भाजपा ठाणे शहर अध्यक्ष संजय वाघुले, इंटरनॅशनल लाईफ कोच पवित्रा सावंत, स्नेहा पाटील, डॉ. राजेश मढवी, महेश कदम, सिताराम राणे आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# धक्कादायक! आधी तरुणीची आत्महत्या, मग त्याच गावातील तरुणाने विष प्राशन करून...




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०८, भंडारा :** एकच गावातील एका तरुण आणि तरुणीने आत्महत्या करण्याचा निर्णय घेतला. काल तरुणीने गळफास लावून आत्महत्या केली, तर आज तरुणाने विष प्राशन करून स्वतःला संपविण्याचा प्रयत्न केला. या घटनांमुळे गावात चर्चांना उधाण आले आहे. या दोघांनी प्रेमप्रकरणातून हे टोकाचे पाऊल उचलले असावे, अशी चर्चा आहे. विशेष म्हणजे, दोघांच्याही कुटुंबीयांनी त्यांचे वेगवेगळ्या ठिकाणी लग्न जोडले होते.

मानसिक तणावात असलेल्या एका वीस वर्षीय तरुणीने स्वतःच्या राहते घरी दि. ७ मार्च रोजी दुपारी साडे तीन वाजताच्या सुमारास लाकडी मयालीला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना लाखांदूर तालुक्यातील जैतपूर येथे घडली. प्रणाली रवी भुरले असे मृतक तरुणीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सदर तरुणी लाखांदूर येथील एका महाविद्यालयात द्वितीय वर्षाला शिक्षण घेत होती. काही दिवसापूर्वी तिचे लग्न जुळून साक्षगंध झाले होते. दि. ७ मार्च रोजी घराच्या बाजूला असलेल्या पडवीत लाकडी मयालीला स्वतःची ओढणी बांधून गळफास घेतल्याचे घरच्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी लगेच शेजारील लोकांच्या मदतीने बारव्हा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे उपचारासाठी दाखल केले. मात्र तेथे उपचाराची सोय नसल्याने व तरुणीची प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी लाखांदूर येथील ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र उपचारादरम्यान तिला मृत घोषित करण्यात आले. तरुणीने आत्महत्या का केली हे गुलदस्त्यात आहे. दिघोरी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरु आहे.

या घटनेने हळहळ व्यक्त केली जात असतानाच गावात दुसरी घटना घडली. दुसऱ्या दिवशी आज ८ जानेवारी रोजी जैतपूर येथील एका तरुणाने देखील विष प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. रंजित दामू घटारे या ३० वर्षीय तरुणाने आज सकाळी १० वाजताच्या सुमारास कीटकनाशक औषधं प्राशन करून स्वतःला संपविण्याचा प्रयत्न केला. विष प्राशन केल्याचे घरच्यांचे लक्षात येताच त्याला भंडारा येथे उपचारासाठी तात्काळ दाखल करण्यात आले. सदर तरुणाचे सुद्धा साक्षगंध झाले होते. सलग दोन दिवस एका मागे एक आत्महत्येच्या घटना घडल्याने गावात तर्कवितर्कांना उधाण आले आहे. दिघोरी पोलीस पुढील तपास करीत आहेत.

# पारनेर आगारात १० नविन बसेस मंजूर : आ.काशिनाथ दाते



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०८, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर- नगर मतदारसंघातील राज्य परिवहन महामंडळाच्या पारनेर आगारात नविन बसेस मिळणेबाबत परिवहन मंत्री प्रतापराव सरनाईक यांना आमदार काशिनाथ दाते सर यांनी निवेदन दिले होते. परिवहन मंत्री प्रतापराव सरनाईक यांनी आमदार काशिनाथ दाते सर यांच्या मागणीची दखल घेऊन पारनेर आगारात नवीन १० बसेस मंजूर करण्यात आल्या असून या बसेसचे लवकरच वितरित करण्यात येणार आहे अशी माहिती आमदार काशिनाथ दाते सर यांनी दिली आहे. मंत्रालय येथे परिवहन मंडळाच्या विविध प्रश्नांबाबत परिवहन मंत्री प्रतापराव सरनाईक, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे, आमदार काशिनाथ दाते, आमदार मोनिकाताई राजळे यांच्या उपस्थितीत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. माहीती देताना आमदार दाते म्हणाले की, पारनेर आगारातील बसेस या खुप जुन्या व जीर्ण झालेल्या आहेत.

त्यामुळे या बसेस मधुन प्रवाशांना प्रवास करणे धोकादायक झाले होते. प्रवास करताना तालुक्यातील वृद्ध, महाविद्यालयीन व शाळकरी विद्यार्थी, विद्यार्थींनी,रुग्ण व प्रवाशांना खुप अडचणींना तोंड द्यावे लागत आहे.या मागील वीस ते पंचवीस वर्षात पारनेर एस.टी आगारात एकही नवीन बस आलेली नाही.पंचवीस बसेसची आवश्यकता आसल्याचे निवेदन राज्याचे परीवहन मंत्री प्रतापराव सरनाईक यांना देऊन याबाबत सहकार्य करावे अशी चर्चा केली होती. या मागणीची दखल घेऊन परिवहन मंत्री सरनाईक यांनी नवीन १० बसेस मंजूर केलेल्या असून या बसेस आगाराच्या ताफ्यामध्ये लवकरच सामाविष्ट होणार असुन टप्प्याटप्प्याने आणखी १५ बसेस देण्याचे आश्वासन दिले आहे.

# संपादकीय



## पतंगराव नव्हे रॉकेटराव !

महाराष्ट्रातील राजकारणात जवळपास तीस वर्ष आपल्या कर्तुत्वाचा ठसा उमविणारे अजातशत्रू व्यक्तिमत्व असलेले काँग्रेसचे जेष्ठ नेते, महाराष्ट्राचे माजी मंत्री पतंगराव कदम यांची आज ७ वी पुण्यतिथी. ७ वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे ९ मार्च २०१८ रोजी त्यांचे निधन झाले. ८ जानेवारी १९४४ रोजी पतंगराव कदम यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील सोनसळ या गावात एका गरीब कुटुंबात झाला.

त्यांचे चौथी पर्यंतचे शिक्षण गावातल्या शाळेत झाले तर सातवी पर्यंतचे शिक्षण शिरसगाव या गावात झाले. ११ वी पर्यंतचे शिक्षण म्हणजे त्या काळातील मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण त्यांनी कमवा व शिका योजनेअंतर्गत पूर्ण केले. एफ. वाय बी. ए नंतर त्यांनी टीचर्स डिप्लोमा पूर्ण केला व शिक्षक होण्याचे स्वप्न उराशी बांधून पुणे गाठले. पुण्यातील हडपसर येथे दहा बाय दहाच्या पत्र्याच्या खोलीत राहून त्यांनी गोरगरिबांच्या मुलांना शिकवण्याचे काम सुरू केले. शिक्षक असतानाच गोरगरिबांच्या मुलांना उच्च शिक्षण मिळावे यासाठी काही तरी करावे असा विचार त्यांच्या मनात येऊ लागला त्यातूनच , भारती विद्यापीठाची मुहूर्तमेढ रोवली गेली. बा. ग. पवार, वसंतराव म्हेत्रे, महादर सर, नीलाखे सर अशा पाच लोकांना घेऊन त्यांनी १० मे १९६४ रोजी भारती विद्यापीठाची स्थापना केली. त्यावेळी त्यांच्या खिशात अवघे ३८ रुपये होते.

हळूहळू भारती विदयापीठाचा विस्तार वाढू लागला. शहराप्रमाणे ग्रामीण भागातही भारती विद्यापीठाच्या पाट्या झळकू लागल्या. भारती विद्यापीठामुळे गोरगरिबांच्या मुलांना इंग्रजीतून शिक्षण मिळू लागले. सर्वसामान्य कुटुंबातील मुले उच्च शिक्षण घेऊ लागली. त्यांनी लावलेल्या भारती विद्यापीठाच्या रोपट्याचे आज वटवृक्ष बनले आहे. के.जी ते पी.जे असे सर्वप्रकारचे शिक्षण आज भारती विद्यापीठातून मिळत आहे. शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य महान असेच आहे.

भारती विद्यापीठाचा पसारा सांभाळीत त्यांनी राजकारणातही ठसा उमटविला. १९६८ साली एस टी महामंडळाच्या सदस्यपदी त्यांची निवड झाली. गाव तिथे एस टी ही योजना राबवून त्यांनी गावागावात एस टी पोहचवली. १९८५ साली त्यांनी अपक्ष म्हणून विधानसभेची निवडणूक लढवली. त्यात ते विजयी झाले. १९९० सालच्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने त्यांना तिकीट दिले तेंव्हापासून १९९५ सालचा अपवाद वगळता ते सतत निवडून आले. २०१४ साली मोदी लाटेत अनेक दिग्गज नेत्यांचा पराभव झाला पण त्यांनी आपला गड राखला. या दरम्यान त्यांनी शिक्षण, सहकार, उद्योग, महसूल, वन या महत्वाच्या खात्याची मंत्रीपदे सांभाळली. इतकी वर्ष मंत्रीपदावर राहूनही त्यांच्यावर एकही आरोप झाला नाही यातच त्यांचा कारभार किती पारदर्शक होता, हे दिसून येते.

काँग्रेस पक्षावर त्यांची नितांत श्रद्धा होती. सत्ता असो वा नसो काँग्रेस पक्षाशी ते कायम एकनिष्ठ राहिले. प्रत्येकवेळी मुख्यमंत्र्यांच्या स्पर्धेत त्यांचे नाव कायम चर्चेत असायचे, पण दुर्दैवाने ते मुख्यमंत्री बनू शकले नाही. तरीही त्यांनी याबाबत कधीही जाहीर नाराजी व्यक्त केली नाही. पक्ष सोडण्याचा विचारही त्यांच्या मनात कधी आला नाही. आजच्या आयाराम गयाराम संस्कृतीत पतंगरावांची निष्ठा उठून दिसते. पतंगराव तरुण पिढीसाठी मार्गदर्शक आहेत.

बेधडक आणि मनमोकळा स्वभाव हे त्यांचे वैशिष्ट्य होते. ओठात एक आणि पोटात एक असे पतंगरावांच्या बाबतीत कधीच झाले नाही. खऱ्याला खरे आणि खोट्याला खोटे म्हणण्याची त्यांची वृत्ती राजकारणात अभावानेच पाहायला मिळते. त्यांचे भाषण म्हणजे पर्वणीच. त्यांच्या भाषणात गावाकडचा रांगडेपणा असायचा. कार्यकर्त्यांचा गराडा कायम त्यांच्यासोबत असायचा. उदघाटनाच्या कार्यक्रमाला पतंगरावांनाच बोलवायचे असा कार्यकर्त्यांचा आग्रह असायचा.

त्यांच्या कामाचा धडाका देखील जबरदस्त असायचा. आपल्या मतदारसंघात त्यांनी कामाचा डोंगर उभा केला होता. आपल्या मतदारसंघात एमआयडीसी उभारून त्यांनी अनेक उद्योगधंदे आणले. सूत गिरण्या, साखर कारखाने, वाईन पार्क, भारती विद्यापीठ, भारती हॉस्पिटल उभारून मोठ्या प्रमाणात उद्योग निर्मिती केली. त्यांच्या कामाचा झपाटा इतका असायचा की, एकदा पु. ल. देशपांडे म्हणाले की, हे पतंगराव नव्हेत तर रॉकेटराव आहेत. पतंगराव कदम यांनी सहकार क्षेत्रातही आपला ठसा उमटविला. ९ मार्च २०१८ रोजी पतंगराव कदम यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्रातील एक असामान्य व्यक्तिमत्व काळाच्या पडदयाआड गेले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राची मोठी हानी झाली. पतंगराव कदम यांना ७ व्या पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन!

# स्त्री आत्मनिर्भरतेसाठी एक पाऊल....!

काळ झापाट्याने बदलत चालला आहे. शिक्षणाने मनुष्याची प्रगती होत आहे.ज्ञान व शिक्षणाने सर्व क्षेत्रात बाजी मारली आहे. स्त्री पुरुष बरोबरीने समाजात वावरत आहे. मात्र काही अंशी महिलाच्या काही समस्या आहेतच तर त्यासाठी महिलांनी ही स्वतः पुढाकार घेऊन आत्मनिर्भर होणे गरजेचे आहे. त्यासाठी पुरेपूर प्रयत्न करायला हवा. व आत्मनिर्भर व्हायला हवे त्यासाठी, धाडसी व्हा. इतरांवर अवलंबून राहू नका.छोटी मोठी कामे स्वतः करा.उदारणार्थ भाज्या विकत घेणे,मुलांना डॉक्टरकडे घेऊन जाणे,मुलांच्या टीचरशी बोलायचे असेल तर तुम्ही स्वतः एकट्या जाऊन बोलू शकता,त्यामुळे तुमचा आत्मसन्मान वाढेल, नकारात्मक विचारांपासून लांब रहा. मी हे करू शकते यामुळे तुमची धाडस वाढेल. सृजनात्मक व्हा. प्रत्येक कार्य उत्तम प्रकारे वेगळे ढंगाने करण्याचा प्रयत्न करा. कोणते काम एकाच पद्धतीने केल्यावर कंटाळा येतो.

वेगळ्या पद्धतीने काम केल्यास नवीन काही सोप्या पद्धती सुचतील. आणि काम करण्याचा आनंद वाटेल.उदा.एखादी भाजी परंतु तीच वेगळ्या पद्धतीने करा. नोकरदार महिलांनी कार्यालयीन कामे नीटनेटके व सुवस्थित करण्याचा प्रयत्न कराअर्थात स्मार्ट वर्क करा,त्यातून तुमची सृजनात्मकशिलता वाढेल. स्वतः निर्णय घ्या. काही लहानसहान निर्णय स्वतः घ्या. निर्णय घेताना घाबरू नका,कारण चुकीचे निर्णय देखील,भविष्यातील योग्य निर्णय घेणे शिकवतात. निर्णय घेताना हृदय आणि बुद्धी दोन्हीचा वापर करा. आज काय करू? आज काय नेसू? ही वस्तू विकत घेऊ की नको? इत्यादी निर्णय स्वतः घेण्याचा प्रयत्न करा. भावनांत्मक समज वाढवा. कोणत्याही गोष्टीमुळे नात्यांमध्ये अथवा शरीरामध्ये मानसिक तणाव उद्भवल्यास आपल्या भावना ओळखा. स्वतःला काही प्रश्न विचारा. अशा नकारात्मक भावना तुमच्यावर का परिणाम करत आहे. आपला राग, तणाव, भीती, दुःखाच्या भावनांना प्रकाशात आणा. हे एखाद्या डायरीत लिहून ठेवा अर्थात भावना कागदावर उतरावा.भावना कुठलीही असो सुख दुःख या भावनांची ताकद ओळखा.त्यांचा उपयोग चांगल्या कामासाठी करा. निर्भय व्हा. भीतीच्या भावनांना भिऊ नका. भीतीचा सामना केल्यानंतरच साहसी बनता येते म्हणून,कितीही भीती वाईट असली तरी भीतीविरुद्ध कार्य करा. जर अंधाराची भीती वाटत असेल तर, अंधारात जाऊन बघा. मनात सकारात्मक विचार ठेवून, या मंत्राचा उच्चार करा,मी ईश्वराची लेक आहे,कोणतीही वाईट शक्ती मला स्पर्श करू शकणार नाही.त्यासाठी निर्भय व्हा.ती सध्या काळाची गरज आहे.

स्त्री तशी जगत जननी आहे. ती सदैव जगाला समर्पणाचे कार्य करत असते. परंतु माया मोह कुणाला सुटला नाही म्हणून देण्याची भावना ठेवा.घेणे नव्हे तर देणे शिका कारण, घेण्यामुळे फक्त निर्वाह होतो पण देण्यामुळे विकास होतो त्याचा फायदा होतो. साधे उदाहरणं कि विवाहप्रसंगी एक सामाजिक प्रथा म्हणून हुंड्या सारख्या प्रथेविरुद्ध महिलांनी विरोध करायला हवा.त्यामुळे कितीतरी हुंडाबळी टळतील. कोणतेही चूक झाल्यावर क्षमा मागा व क्षमा करण्याचा संकोच बाळगू नका. त्यामुळे आपापसातील प्रेम वाढेल.

समोरचा माणूस कसा चुकला हे आपल्याला बघायचे नसून समोरचा माणूस कसा बरोबर आहे हे बघायचे आहे. चांगल्या सवयी लावा. सवयीचे वेळापत्रक बनवा व ते अंमलात आणण्याचा त्याचप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करा. सुरुवातीला लहान-लहान प्रयोग करा. सकाळी लवकर उठणे, व्यायाम करणे, कामे वेळेवर पूर्णकरणे असे करताना सुरुवातीला त्रास होईल पण, हळूहळू हे सर्व सोपे वाटू लागेल त्यातून उर्वरित वेळ स्वतःसाठी मिळेल व स्वतः साठी काही वेगळं करण्याची अनुभूती येईल जसे कि, वाचन,लिखाण आवडीचं काम,छंद, कलाकृती वगैरे त्यातून आनंद निर्मिती होईल. त्याचबरोबर दररोज व्यायाम करण्याची सवय आवश्य लावा. माणूस प्रथम स्वतःच्या सवयी तयार करतो आणि नंतर या सवयी माणसाला घडवतात.कार्यात पुढाकार घ्या.आळस व इतर तमो गुणांपासून दूर राहा.कित्येक काम अशी असतातकि जी आपणास करावीशी वाटतात पण आपण नाही मात्र अशा कामांकरिता पुढाकार घ्या. त्यातून नेतृत्व करण्याची संधी मिळेल.

महिलानी एकत्र येऊन संघ, गट तयार कर फावला वेळ घालवण्यासाठी एखाद्या चांगल्या संस्थेचे सभासद किंवा चांगल्या गटात सहभागी व्हा.आपल्यातील सामर्थ्य व शक्ती इतरांना कळू द्या जेणेकरून,आपल्या ताकतीचा वापर करून इतरांनाही त्यांच्या कामात मदतीस येईल.तुमच्या मैत्रिणींना तुमची व तुमची मैत्रीणींना मदत होईल. आवडीच्या क्षेत्रातील ज्ञान प्राप्त करा.सदैव नवीन काहीतरी शिकण्याचा दृष्टिकोन ठेवा.पुरुष व मुले अतिकतर काम नोकरीं निमित्ताने बाहेर असतात. त्यामुळे बरेच काही शिकतात स्त्रीया मात्र घरातच असतात म्ह्णून नवीन गोष्टीचे ज्ञान त्यांना लवकर अवगत होत नाही.त्यासाठी पुस्तक, वर्तमानपत्र, दूरदर्शनवरील चांगले कार्यक्रम यातून ज्ञान मिळवा.सतत आपले ज्ञान वाढवण्यासाठी वेळ काढा. कमीत कमी दिवसभरातून एक तास तरी नवीन काहीतरी शिकण्यासाठी ठेवा.सदैव दृष्टिकोन ज्ञानावर असू द्या. स्त्री ही प्रेम व मायाने ओपप्रोत भरलीआहे. राग, द्वेष, घृणा पासून सावध राहा.या भावना प्रत्येकात असतात व असणे स्वाभाविक आहे. कारण या भावना सुरक्षा आणि सावध राहण्यासाठी दिलेल्या असतात परंतु,या भावना आपल्या व घरच्यांच्या विकासासाठी वापरा. वस्तुतः प्रेम अशी वस्तू आहे जी इतरांना दिलेली मिळतेच.

आधुनिक काळात महिलांना प्रबंधकाची भूमिका करणे सुद्धा गरजेचे आहे. म्हूणन प्रबंधक व्हा.जे काम जगातील कोणताही माणूस करू शकतो ते काम तुम्ही करू शकता. आपल्या शक्तीवर विश्वास ठेवा. संधी ओळखा. यश जरूर मिळेल. जे कार्य आपण आज आणि आता करत आहात ते चांगल्या तऱ्हेने करा. जे आपण काल केले होते त्यातून धडा घ्यावा. जे काम आपण उद्या करणार आहोत ते चांगलेच होईल. वेळ,शक्ती आणि धनाचा योग्य उपयोग केल्यास जीवनात यश नक्कीच मिळेल. निरीक्षणावर भर द्या. आजूबाजूच्या चांगल्या गोष्टीची नोंद ठेवुन जीवनात योग्य ठिकाणी त्याचा वापर करा. परमेश्वराची प्रार्थना करा त्यातून आत्मशांती लाभते. त्यागाची भावना ठेवा. त्यागामुळे प्रेमाची पारख होते. कोणत्याही कारणामुळे संबंधात जर तणाव आले तर ते लगेच दूर करण्याचा प्रयत्न करा. तणाव मुक्त रहा. कोणताही माणूस परिपूर्ण नसतो म्हणून लवचिक बुद्धी ठेवा. आपले ज्ञान वाढवण्यासाठी चांगल्या पुस्तकांची मदत घ्या. लहानात लहान मदत मिळाली तरी धन्यवाद किंवा आभारी यासारख्या शब्दांचा वापर करा. आपल्या भावना योग्य शब्दात व्यक्त करा प्रत्येक वेळी दुसऱ्यांच्या हो मध्ये हो आणि नाही मध्ये नकारार्थी दुःख हलवू नका योग्य वाटले तर बोलावे. असा नियम नाही अनुचित वाटल्यानंतर देखील आपल्या प्रतिक्रिया अवश्य व्यक्त करा. आपल्या भावना इतरांपुढे अवश्य जाहीर करा. आपल्या भावनांना इतरांसमोर प्रकट करताना अजिबात घाबरू नका.आपण नेहमी आशा करतो की, समोरच्या माणसाने आपल्या भावना जाणून घ्यावा. तोपर्यंत आपण शब्दात सांगणार नाही तोपर्यंत समोरचा माणूस समजू शकणार नाही म्हणून, आपल्या भावना योग्य शब्दात व्यक्त करणे फार आवश्यक असत म्हणून व्यक्त व्हा.

स्त्री ही जीवनाचा आधारस्तंभ आहे ती मजबूत आणि सुदृढ असणं फार आवश्यक आहे श्री ही जननी आहे तुला आपल्या तब्येतीविषयी सतत जागरूक राहायला हवे. शारीरिक स्वास्था बरोबर मानसिक स्वास्थ्य जपणे गरजेचे आहे यासाठी ध्यान, मेडिटेशन करा,उत्साही रहा प्रत्येक दिवस हा एक उपहार आहे म्हणून हसत रहा आणि प्रत्येक नव्या दिवसासाठी परमेश्वराला धन्यवाद द्या. व परमेश्वराच्या आशिर्वादाने व कष्ट मेहनतीने आत्मनिर्भरतेसाठी एक एक पाऊल पुढे टाकत चला.

शेवटी एक मुद्दा आवर्जून नमूद करावासा वाटतो तो म्हणजे विश्वास ठेवु नका..! सार्वजनिक ठिकाणी वावरतांना कुणी तुम्हांला ताई म्हणो कि आई म्हणो अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका.सद्या नितिमुल्याचे शिक्षण लयास जात आहे. पश्चिमात्य शिक्षण पद्धती, अनुकरण, मोबाईलचा अति वापर, इंटरनेटच्या माध्यमातून सहज उपलब्ध होणारे अनैतिक चित्राफिती, चित्रपटसृष्टीतील अश्लीलता यामुळे तरुणांचे बदललेली मानसिकता त्यातून व्यसन, मनोरुग्णता यातून माहिलां अत्याचार होत आहे.नराधमवृत्ती अन अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका.

अशाप्रकारे स्त्री ही समाजातील मूलभूत घटक असून,नवीन पिढी घडवणारी, कुटूंबव्यस्थेतील महत्वाचा कणा असणारी, घरघरात सुसंवाद घडवून आणणारी राखणारी, घराला घरपण निर्माण करून देणारी दिव्य शक्तीस शतशः नमन....! व माया, प्रेम, वात्सल्य, मांगल्य, मातृत्व व कर्तृत्व यांची जगाला ओळख निर्माण करून देणाऱ्या सर्व ताई आई-बहिणींना **जागतिक महिला दिनाच्या**

**खूप खूप शुभेच्छा....!**

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि.बुलडाणा**
**मो.नं.९७६३२८२०७७**

## गृहिणी..

संसाराचे यशामध्ये
पत्नीचा मुख्यवाटा
शोधते नव उत्साहे
वाटचाल छानवाटा

तिच्यास्थाई साठला
बृहत् गुणांचा साठा
गृहिणीचासंसाररथा
आधार अदृश्यमोठा

गृहस्थाश्रम सजला
जरी गृहिणीचा रेटा
दुय्यम स्थान भार्येस
मनात सलतो काटा

नारी उचले गोवर्धन
तरी नसे कुठे ताठा
सारे वंदती शिखरा
पायथ्यास मूक विटा

पानाचे होई कौतुक
ना कृतज्ञ हरित देठा
नारीमान कसा कळे
रे पुरूष प्रधान भाटा

सिमांतराहून करे ती
हळूवार मस्करी थट्टा
कामात व्यग्र बायका
आमचा गप्पांचा कट्टा

कृतज्ञता दाखवायले
लागतात कुठे नोटा
दमलीस का ग सखे
शब्दयावे कधी ओठा

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# चार्ली चॅप्लिनची शिकवण !

**चार्ली चॅप्लिन ८८ वर्षे जगला...**
**त्याने आम्हाला ४ विधाने शिकवली -**

**(१)** या जगात काहीही कायमचे नाही, अगदी आपल्या समस्याही नाहीत.

**(२)** मला पावसात फिरायला आवडते,कारण माझे अश्रू कोणी पाहू शकत नाही.

**(३)** आयुष्यातील सर्वात हरवलेला दिवस म्हणजे आपण हसत नाही तो दिवस.

**(४)** जगातील सहा सर्वोत्तम डॉक्टर... सूर्य, विश्रांती, व्यायाम, आहार, स्वाभिमान, मित्र. तुमच्या आयुष्याच्या सर्व टप्प्यांवर त्यांना चिकटून राहा आणि निरोगी आयुष्याचा आनंद घ्या... चंद्र दिसला तर देवाचे सौंदर्य दिसेल...जर तुम्ही सूर्य पाहिला तर तुम्हाला देवाची शक्ती दिसेल... जर तुम्ही आरसा पाहिला तर तुम्हाला देवाची सर्वोत्तम निर्मिती दिसेल. त्यामुळे विश्वास ठेवा. आम्ही सर्व पर्यटक आहोत, देव आमचा ट्रॅव्हल एजंट आहे ज्याने आमचे मार्ग, बुकिंग आणि गंतव्यस्थाने आधीच ओळखली आहेत... त्याच्यावर विश्वास ठेवा आणि जीवनाचा आनंद घ्या.

आयुष्य म्हणजे फक्त एक प्रवास! म्हणून, आज जगा! उद्या कदाचित नसेल.

व्हाट्सअप वरून फिरणाऱ्या या चार्ली चॅप्लिनच्या संदेशातील त्यानी सांगितलेले चार वाक्य प्रभावित करणारी अशीच आहेत . जीवनात कोणतीही गोष्ट स्थायी नाही. सुख-दुःख,साधन संपत्ती, सत्ता यासारख्या गोष्टींपासून ते स्वतःच्या समस्या, शरीर संपदा, सौंदर्य आणि बरच काही शाश्वत नाही. इतकच नव्हे तर माणसाचं जीवन सुद्धा शाश्वत नाही. जाता जाता कोणाला मृत्यू गाठेल हे देखील सांगता येत नाही. अचानक एखाद्याचा मृत्यू झाल्याची बातमी ऐकायला मिळते, आणि आपण हळहळ व्यक्त करतो. सकाळीच बोलून गेला, खुशाली सांगून गेला आणि दुपारी कसं काय असं घडलं...? असा प्रश्न आपण विचारत राहतो. म्हणून स्वतःच्या समस्यांना कवटाळून बसून त्या समस्या सुटणार नाहीत याची जाणीव आपण नेहमी ठेवली पाहिजे. आपल्या १० समस्या पैकी २ ते ३ समस्या या कधीच न सुटणाऱ्या असतात. ५ समस्या तर एकदम चुटकीशीर सुटणाऱ्या असतात. उरलेल्या २ ते ३ समस्या या आपल्या कौशल्याने आणि कष्टाने सोडवायच्या असतात. समस्या सुटत नाहीत म्हणून आत्महत्येचा विचार मनात येणाऱ्यानी चार्ली चॅप्लिनचे हे वाक्य डोळ्यासमोर आणले पाहिजे. चार्ली चॅप्लिन हा विनोदी कलाकार म्हणून जगप्रसिद्ध आहे. दुसऱ्याला हसवणारा हा महानायक वैयक्तिक जीवनातील आपले दुःख इतरांपासून लपवून ठेवण्याची कटाक्ष पाळत होता. त्यांनी एकदा म्हटलं होतं की, 'माझं दुःख कोणाच्या तरी हसण्याचं कारण होऊ शकतं, पण माझं हास्य कोणाच्याच दुःखाचं कारण होऊ शकत नाही.' काही लोक हे नेहमी रडत असतात. आपल्या दुःखाचे आणि वैयक्तिक जीवनातील समस्यांचे सतत प्रदर्शन करत असतात. इतरांकडून सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न करतात. आपले दुःख इतरांसमोर मांडून ते कमी होणार नाही याची जाणीव आपण नेहमी ठेवली पाहिजे. उलट काही हितशत्रू आपल्या या दुःखाचा अथवा समस्याचा गैरफायदा घेऊ शकतील ; ते तुमची भावनिक कोंडी करून स्वतःचा फायदा करून घेऊ शकतील. दुःख प्रत्येकालाच असतं कोणाच्या वाट्याला कमी, तर कोणाच्या वाट्याला जास्तीच दुःख येतं, पण त्याचं भांडवल करणं आपण टाळलं पाहिजे! चार्ली चॅप्लिनने अफाट विनोदाची निर्मिती केली. लोकांना त्याने पोट धरून हसायला लावलं. म्हणून तो अधिकार वाणीने लोकांना सांगतो,की 'आयुष्यातील सर्वात हलवरलेला दिवस म्हणजे आपण हसत नाही तो दिवस!' म्हणून आपण हसलं पाहिजे. चार्ली चॅप्लिनच्या मते जगातील सहा सर्वोत्तम डॉक्टर सूर्य, विश्रांती, व्यायाम, आहार, स्वाभिमान, मित्र आहेत. सूर्य हा संपूर्ण सजीव सृष्टीचा ऊर्जा स्त्रोत आहे. सकाळचे कवळे ऊन आपणास 'डी' जीवनसत्व देते, ज्यामुळे आपली हाडे बळकट होतात. सूर्य हा तेजाचे प्रतीक आहे. सूर्याप्रमाणे स्वयंप्रकाशित आणि तेजोमय होऊन या जीवनाचे आपण सोनं केलं पाहिजे. विश्रांती अथवा झोप ही आपल्या शरीरास मोबाईलच्या चार्जर प्रमाणे 'चार्ज' करत असते. प्रत्येक व्यक्तीने सात ते आठ तास झोप घेतली पाहिजे. 'व्यायाम' ही दीर्घायुष्याची गुरुकिल्ली आहे. दररोज ४५ मिनिटे आपण आपल्या वयोमानानुसार हलका, मध्यम किंवा भारी व्यायाम केला पाहिजे. शरीरास आवश्यक असणारी ऊर्जा मिळण्यासाठी आपण सकस आणि चौरस आहार घेत असतो. भूक लागली तरच खाल्लं पाहिजे.पोट टम्म भरून न खाता, पचेल आणि रुचेल तेवढेच खाल्लं पाहिजे.आज कुपोषणाने जाणाऱ्या बळीपेक्षा, अतिरिक्त आहार खाण्यामुळे होणाऱ्या आजारपणात जास्त मृत्यू होत आहेत. आपला स्वाभिमान कधीच गहाण ठेवू नये. दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिऊन तहान कधीच भागत नसते. स्वाभिमानी माणूस हा आपल्या स्वतंत्र शैलीत स्वतःचं आयुष्य जगत असतो. स्वतःच्या जगण्याचा एक नवीन मार्ग तो निर्माण करतो. तो कोणाचे अंध अनुकरण करत नाही. तो स्वयंभू असतो. 'लाथ मारीन तिथें पाणी काढीन !' हा त्याचा खाक्या असतो. स्वाभिमानी व्यक्ती हा कधीच मानसिक रुग्ण होऊ शकत नाही. तो भावनिक रित्या सक्षम असतो. चांगले मित्र हे आपले मार्गदर्शक, सहकारी आणि उनिवा दाखवणारे असतात. मित्र आपल्या चांगल्या वाईट काळात साथ देतात. म्हणून चांगले मित्र ही सुद्धा एक संपत्ती आहे. ही संपत्ती आपण जपली पाहिजे.

'आपलं आयुष्य जवळून पाहिलं तर शोकांतिका आहे आणि दुरून पाहिलं तर हास्यविनोद' असं तो म्हणायचा; आणि असंच तो आपलं आयुष्य देखील जगला...

**- किशोर जाधव, सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## जागतिक महिला दिनानिमित्ताने खाकीतील सखी कार्यक्रमाचे आयोजन




**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.०८, डोंबिवली (ठाणे) :** जागतिक महिला दिनानिमित्त डोंबिवली लोहमार्ग पोलीस ठाणे येथे सर्व पोलीस महिला अंमलदार व महिला होमगार्ड, खाकितील सखी सदस्य, महिला सुरक्षा समिती सदस्य, प्रवासी संघटना पदाधिकारी याना जागतीक महिला दिनाच्या शुभेच्छा लोहमार्ग पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक किरण उंदरे यांनी देवुन गुलाब फुल वाटप करण्यात आले. तसेच पोलीस ठाणेत महिला सुरक्षा दक्षता समिती सदस्यांना बोलावून त्यांची बैठक घेऊन त्यांना गुलाब फुल देऊन महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. डोंबिवली रेल्वे पोलीस स्टेशन कडील महिला पोलीस अंमलदार, होमगार्ड व रेल्वे सुरक्षा समिती सदस्यांना यांना गुलाब पुष्प देऊन महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच खाकितील सखी बाबत महिला सुरक्षा जनजागृती करण्यात आली. तसेच प्लँटफॉर्म वरील व ट्रेनमधील महिला प्रवाशी यांना गुलाब पुष्प देऊन हार्दिक शुभेच्छा दिल्या तसेच त्यांना खालील प्रमाणे मार्गदर्शन केले.

१) आम्ही सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार महिला सुरक्षिततेसाठी बांधील असून महिलांना रेल्वे प्रवासात खाकितील सखी व कोटो ॲपमध्ये सहभाग घ्यावा.

२) महिलांनी रात्री प्रवास करते वेळी शक्यतो महिलांच्या डब्यातूनच प्रवास करावा, त्यामध्ये पोलीस अंमलदार यांची नेमणूक असते.

३) रात्रीच्या वेळेस स्टेशन थांबण्याची वेळ आल्यास शक्यतो स्टेशन वरील किंवा स्टॉलधारकांनी लावण्यात आलेल्या कॅमेऱ्यात सहज दिसता येइल असे थांबावे.

४) प्रवासा दरम्यान आपल्या मौल्यवान चीज वस्तू सांभाळून प्रवास करावा.

५) प्रवासा दरम्यान येणाऱ्या अडी-अडचणी बाबत रेल्वे पोलीस हेल्प लाईन १५१२ या क्रमांकाचा वापर करावा. सदर वेळी लोहमार्ग पोलीस ठाण्याचे २१ महिला पोलीस अंमलदार ०८ महिला होमगार्ड व ०६ महिला सुरक्षा समिती सदस्य उपस्थित होते.

## आशियाई अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेत भारतीय महिला संघ विजेते




**अक्षराज : संदिप येवले**

**दि.०८, मुंबई :** भारताच्या महिला संघाने तेहरान, इराण येथे झालेल्या सहाव्या महिला आशियाई अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेत पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले. आज झालेल्या अंतिम सामन्यात भारताने इराणला ३२-२५ असे नमवित पाचव्यांदा या चषकावर आपले नाव कोरले. फक्त एकदाच दक्षिण कोरिया संघाने या स्पर्धेचे विजेतेपद मिळविले. संघनायिका सोनाली शिंगटे, पूजा यांच्या धारदार चढाया त्यांना साक्षी शर्मा, ज्योती यांची मिळालेली पकडीची साथ यामुळेच भारताने हे विजेतेपद मिळविले. या स्पर्धेत एकूण ७ देशाचे संघ सहभागी झाले होते. भारताचा समावेश अ-गटात होता. त्या गटात बांगलादेश, थायलंड व म लेशिया हे संघ होते. साखळी सामन्यात भारताने सर्व सामने एकतर्फी जिंकून अव्वल स्थान मिळवले होते. उपांत्य सामन्यात भारताने नेपाळचा ५६-१८ असा पराभव करीत अंतिम फेरी गाठली होती. तेहरानला या स्पर्धा आयोजनाची दुसऱ्यांदा (प्रथम २००७ व आता २०२५) संधी मिळाली.

## महिला दिनानिमित्त महिला सुरक्षा बल जवानांना सन्मानचिन्ह देऊन सत्कार




**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.०८, डोंबिवली (ठाणे) :** जागतिक महिला दिवस ०८ मार्च रोजी रेल्वे सुरक्षा बल डोंबिवली वरिष्ठ निरीक्षक गजेंद्र राऊत यांनी आपल्या कार्यालयामध्ये जागतिक महिला दिनाच्या कार्यक्रम आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये रेल्वे सुरक्षा बलाचे महिला जवानांना सन्मान चिन्ह देऊन त्यांचे सत्कार करण्यात आली. त्यासोबत रेल्वे स्टेशन डोंबिवली महिला प्रवासी यांना गुलाब व फुले देऊन त्यांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा ही दिल्या. या कार्यक्रमांमध्ये सुरक्षा संदर्भात स्मार्ट सहेली बाबत त्यांना जनजागृती करून मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमामध्ये उपस्थित असलेले महिला प्रवासी यांनी डोंबिवली रेल्वे सुरक्षा बलाचे आभार व्यक्त केले.

## माझी वसुंधरा अभियानात अहिरे ग्रामपंचायत तालुक्यात प्रथम

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०८, खंडाळा (सातारा) :** पंचतत्वाचे संवर्धन,संरक्षण व जतन करून शाश्वत विकास साधण्यासाठी पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग महाराष्ट्र शासन यांच्यावतीने सुरु केलेल्या माझी वसुंधरा अभियान ४.० मध्ये सन २०२३-२४ उल्लेखनिय कामगिरी करत खंडाळा तालुक्यात ग्रामपंचायत अहिरेने प्रथम क्रमांक मिळवला. पंचायत समिती खंडाळा प्रशासनाच्या वतीने शनिवार, दि.०८ मार्च २०२५ रोजी स्व.किसनवीर सभागृहात आयोजित जागतिक महिला दिन व तालुकास्तर पाणी गुणवत्ता विषयक प्रशिक्षण कार्यक्रमात अहिरे ग्रामपंचायत सरपंच रवींद्र सोनवणे, उपसरपंच साधना धायगुडे, माजी उपसरपंच दयानंद धायगुडे, ग्रामपंचायत अधिकारी सुनिल धायगुडे, डेटा ऑपरेटर तृप्ती धायगुडे यांना गटविकास अधिकारी अनिल वाघमारे, विस्तार अधिकारी बोडरे व अधिकारी वर्ग पंचायत समिती खंडाळा यांचेकडून प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. अहिरे ग्रामपंचायतचे उच्चशिक्षित कार्यकुशल सरपंच रवींद्र सोनवणे व उपसरपंच व सर्व सदस्य यांनी अहिरे गावात पंचतत्व संवर्धन, संरक्षण व जतन करत गावच्या शास्वत सर्वांगीण विकासात उल्लेखनिय कामगिरी करत माझी वसुंधरा अभियान ४.० सन २०२३-२०२४ मध्ये तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल खंडाळा पंचायत समितीच्या वतीने त्यांना सन्मानित करण्यात आले. या अभियानाची लोकचळवळ व्हावी. याकरिता पुढील वाटचालीस त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

## मीरा-भाईंदर येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायालयीन नूतन इमारतीचे उद्घाटन

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०८, मिरा भाईंदर :** आज जागतिक महिला दिनी मीरा-भाईंदर येथील दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालयीन नूतन इमारतीचे उद्घाटन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय ओक यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती अलोक आराधे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती गौरी गोडसे, न्यायमूर्ती गिरीष कुलकर्णी, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, ठाणे जिल्हा सत्र न्यायालयाचे श्रीनिवास अग्रवाल, मीरा भाईंदरचे न्यायमूर्ती एस. एस. जाधव तसेच आम दार नरेंद्र मेहता, माजी आमदार गीता जैन, गिल्बर्ट मेंडासा, पोलीस आयुक्त मीरा भाईंदर संजय पांडे, गोवा बार कौन्सिलचे अध्यक्ष सुदीप पाचगोळे, ठाणे जिल्हा बार कौन्सिलचे अध्यक्ष गजानन चव्हाण व वकील संघटना अध्यक्ष व पदाधिकारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, ही केवळ दगड विटांची एक इमारत नसून न्यायमंदीर होणार आहे. आज जागतिक महिला दिन असून सर्व लाडक्या वकील बहिणी व लाडके वकील भाऊ यांना शुभेच्छा व अभिनंदन करतो. आज येथे न्यायालयाची स्थापना होत आहे. २००८ साली बार कौन्सिल संघटना होती, परंतू येथे न्यायालय नव्हते.

ते पुढे म्हणाले की, आपण सर्वांनी कॉमन मॅनसारखे राहावे, कारण सर्वसाम ान्यांना न्याय देण्याचे काम कॉमन मॅन सारखे करीत आहात. सर्वसामान्य म ाणूस हा केंद्रबिंदू आहे. सर्वसामान्यांना न्याय मिळत आहे. न्यायालये उभी राहत



आहेत. यासाठी विलंब झाला असला तरी न्याय फॉस्ट ट्रकवर मिळेल. येथे न्यायालयासाठी अधिक जागा पाहिजे असल्याने यासाठी बाजूला उपलब्ध असलेल्या जमिनीबाबत संबंधित यंत्रणांनी याबाबत लक्ष घालून जागा उपलब्ध करण्यासाठी शासन प्रयत्न करणार आहे. त्यामुळे ठाण्याला जायची आवश्यकता लागणार नाही. तसेच न्यायालयात येणाऱ्या सर्वसामान्यांना येण्या जाण्याची अडचण व ट्राफिकच्या सुविधेबाबत आपण प्रयत्न सुरु केले असून पब्लिक पॉड टॅक्सी, मेट्रो, वाहतूक कोंडी कमी करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. त्याचप्रमाणे इन्फ्रास्ट्रक्चर महत्वाचे आहे. सध्या न्यायालय कमी असल्याने तारीख पे तारीख मिळत आहे. यासाठी मंत्रीमंडळात विधीविषयक येणाऱ्या प्रस्तावास मंजूरी दिली. मी मुख्यमंत्री होतो, त्यावेळी या टिमने ३२ न्यायालये व १४ जिल्हा अतिरिक्त सत्र न्यायालयांची निर्मिती केली. सेवानिवृत्त न्यायिक अधिकाऱ्यांना वैद्यकीय सुविधा मंजूर केली व २ हजार अतिरिक्त न्यायाधीशांची पदे निर्माण केली. न्यायादानाचा वसा पुढे घेऊन जाण्यासाठी हा प्रयत्न केला गेला. कुणीतरी सांगितले, न्याय आपल्या दारी परंतू आपण सरकारतर्फे शासन आपल्या दारी ही संकल्पना राबवून सर्वसाम ान्यांना न्याय दिला आहे. म्हणून आज न्याय मीरा भाईंदरच्या दारी आले आहे. पुढील काही दिवसात ठाणे येथील मुख्य न्यायालयाचे काम पूर्ण होणार असून थोडे दिवसात त्याचेही उद्घाटन होणार आहे, असेही ते यावेळी म्हणाले.

याप्रसंगी सर्वेच्य न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय ओक यांनी सांगितले की, मीरा भाईंदरच्या नागरिकांचे अनेक वर्ष असलेले स्वप्न आज पूर्ण होत आहे. ठाणे जिल्ह्याचे न्यायक्षेत्र खूप मोठे आहे. भारतातील एकच असा जिल्हा आहे की, ठाणे जिल्ह्यात सात महानगरपालिका आहे. कुठल्याही जिल्ह्यात इतक्या महानगरपालिका नाहीत. या ठाणे जिल्ह्यात न्यायालयाचे अधिकारांचे विकेंद्रीकरण करत गेलो. कारण घटनेने अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले आहे. त्यात मीडियादेखील महत्वाचे असून प्रसारमाध्यम टिकवून ठेवणे न्याय व्यवस्थेची जबाबदारी आहे. एक उदाहरण सांगतो की, ठाणे येथे १९८३ पासून वकील संघटना आहे. परंतू न्यायालयविषयक कधीही बहिष्कार व तक्रारी आजपर्यंत आल्या नाहीत व न्याय व्यवस्थेविषयक वेडेवाकडे ठरावही केले नाहीत. त्यामुळे यापुढेही असेच सहकार्य करावे, ही आशा.

ते पुढे म्हणाले की, आज नवीन न्यायालयाचे उदघाटन होत आहे. परंतू नवीन न्यायालयाची जबाबदारी ही सर्वांची आहे. चांगली इमारत, चांगला न्याय दिला पाहिजे. कायदा संकल्पना ही घटनेचा गाभा आहे. त्यामुळे जबाबदारी वाढली आहे. चांगल्या प्रतीचा न्याय नागरिकांना मिळाला पाहिजे. परंतू घाईघाईने पण नाही तर लवकर दिला पाहिजे, दोन्ही गोष्टीत फरक आहे. त्याचप्रमाणे ४ ते ५ वर्ष जुने खटले प्रलंबित न ठेवण्याचा निर्धार केला पाहिजे. नवीन न्यायालय परिसर स्वच्छ ठेवणे, ही आपली जबाबदारी व कर्तव्य असले पाहिजे. सामान्य पक्षकारास बसण्यासाठी, पिण्याच्या पाण्यासाठी, प्रसाधनगृह सुविधा दिल्या पाहिजे.

यावेळी मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती अलोक आराधे यांनी जागतिक महिला दिनी सर्वांना शुभेच्छा देत म्हणाले की, न्याय हा लोकशाहीचा महत्वाचा स्तंभ आहे. न्यायालयाचे विकोप राहावे यासाठी प्रयत्न केला पाहिजे. यासाठी लोकअदालत, वादविवाद पर्याय अवंलबावे. न्यायालयीन कामाचा ताण वाढत असून यासाठी डिजिटायझेशन, पेपरलेससाठी पर्यायी व्यवस्था, प्रत्यक्ष अप्रत्यक्ष प्रयत्न केला पाहिजे.

यावेळी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी म्हणाले की, न्यायालयाच्या पवित्र वास्तूचे आज जागतिक महिला दिनी उद्घाटन होणे हे खूप भाग्याचे आहे. न्याय आपल्या दारी ही संकल्पना साकारल्यास वेळ वाचणार आहे. सामान्य माणसाची व्यथा, जीवनशैली, त्याचे श्रम वाचणे आवश्यक आहे. परंतू ही गोष्टी तोंडी सागूंन चालणार नाही. सध्या अंगणात न्यायालय असल्याने येथील पायाभूत सुविधा प्रलंबित खटले, बार कौन्सिलसाठी बसण्याची व्यवस्था, कॅन्टीन अशा गोष्टी दर्जेदार असल्या पाहिजे.

शेवटी आभार प्रदर्शन मीरा भाईंदरचे न्यायमूर्ती एस. एस. जाधव यांनी केले.

## नैसर्गिक शेती करणे काळाची गरज : उपविभागीय कृषी अधिकारी श्रेयश यादव

**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.०८, उदगीर लातूर :** मौजे गुडसूर तालुका उदगीर येथे डॉक्टर पंजाबराव देशम ुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत स्थापित गटातील सदस्यांना निविष्ठा निर्मिती ड्रम चे वाटप कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष नैसर्गिक शेती करणारे प्रगतीशिल शेतकरी मेघराज म ुडपे होते तर या कार्यक्रमाचे प्रमुख उद्घाटक म्हणून उपविभागीय कृषी अधिकारी श्रेयस यादव हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्राध्यापक डॉक्टर प्रफुल पाटील, पशुवैद्यकीय महाविद्यालय उदगीर हे होते.

तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक आत्मा नितीन दुरुगकर यांनी तालुका कृषी अधिकारी संजय नाबदे यांच्या म ार्गदर्शनाखाली डॉक्टर पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत तालुक्यात गटस्थापना कशी केली व शेतकरी उत्पादक कंपनीच्या माध्यमातून त्यांची पुढची वाटचाल कशी असेल याबद्दल संपूर्ण माहिती उपस्थित शेतकऱ्यांना दिली.

प्राध्यापक डॉ. प्रफुल पाटील यांनी गो वंशाचे महत्व, गो वंशाचा संगोपन व नैसर्गिक शेतीमध्ये गो वंशाची गरज, गो




आधारित शेती , रोग प्रतिकारक्षमता कमी होण्याची कारणे व प्रत्यक्ष शेतकऱ्याने पशुपालन का करावे या संबंधित सविस्तर माहिती दिली.

उद्घाटन प्रसंगी बोलताना उपविभागीय कृषी अधिकारी श्रेयस यादव यांनी नैसर्गिक शेती काळाची गरज बनली असून जीवामृत, बिजामृत, दशपर्णी अर्क, लिंबोळी अर्क, कंपोस्ट खत, गांडूळ खत अशा सेंद्रिय निविष्ठा वापरून आपल्याला शेतीतला खर्च कमी करून आपल्याला जास्तीत जास्त उत्पादन कसे घेता येईल याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले रासायनिक खते, कीटकनाशके, तणनाशके इत्यादीचा अतिवापरामुळे बिघडलेला जमिनीचा पोत सुधरवायचा असेल तर नैसर्गिक शेती शिवाय दुसरा पर्याय नाही या घातक रसायनामुळे आपल्या शरीरावरील विपरीत परिणाम होत असून शुगर बीपी कॅन्सर यासारख्या रोगांना आपण बळी पडत आहोत, आपली प्रतिकार क्षमता वाढवायची असेल तर नैसर्गिक पद्धतीने शिकवलेले अन्नाचा समावेश आपल्या आहारात केला पाहिजे अन्यथा आपले आरोग्य व शेतीचे आरोग्य घसरल्या शिवाय राहणार नाही असे सांगितले. कृषी सहाय्यक दर्शन केंद्रे यांनी कृषि विभागाच्या अन्य योजना, अग्रीस्टेट, महाडिबिटी, फळबाग लागवड, पाणलोट कार्यक्रम बद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. प्रगतशील शेतकरी रत्नाकर आजच्या काळात श्रीमंती ही पैशाची नसून शरीराचे स्वास्थ्य सुदृढ असणे हीच खरी श्रीमंती आहे त्यामुळे कमीत कमी आपल्या घरच्यांचे आरोग्य सुधारण्याकरता नैसर्गिक शेती करावी असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले. तालुक्यात स्थापन झालेल्या मल्लेश्वर नैसर्गिक शेतकरी गट, किणी चे अध्यक्ष बाबुराव नारागुडे, प्रगती नैसर्गिक शेतकरी गट, मोर्तळवडी चे अध्यक्ष गणपत भोसले, सावली नैसर्गिक शेतकरी गट, पिंपरी चे अध्यक्ष रत्नाकर बिरादार, पांडुरंग नैसर्गिक शेतकरी गट, लिंबागाव चे अध्यक्ष . जितेंद्र शेळके, बळीराजा नैसर्गिक शेतकरी गट, हांदर्गुळी चे अध्यक्ष . अमोल भोसले, गुरुकृपा नैसर्गिक शेतकरी गट, सताळा चे अध्यक्ष रामेश्वर उलागड्डे यांना गटाचे नोंदणी प्रमाणपत्र उपस्थित म ान्यवरांच्या हस्ते देण्यात आले.

या कार्यक्रमाला मंचावर मंडळ कृषी अधिकारी देवर्जन प्रज्ञा सपकाळ, सतीश भांडेकरी, कृषी सहाय्यक,नळगिर,सरपंच उत्तम सूर्यवंशी, सोसायटी चेअरमन कालिदास दनडीमे, सोसायटी व्हॉईस चेअरमन अनिल लांजे , माऊली ॲग्री फार्मर प्रोडूसर कंपनी, गुडसूर चे अध्यक्ष अविनाश वळसे, प्रगतशील शेतकरी माधव मलकंपट्टे, गोपाळ हेलंबे, नागेश नवांडे, सोपान मुस्कावड, गुंडेराव हेळबे,विश्वनाथ होळसंबरे उपस्थित होते.

## ग्रामपंचायत नारायण चिंचोली येथे जागतिक महिला दिन विविध उपक्रमाने साजरा

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०८, पंढरपूर :** जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने ८ मार्च २०२५ रोजी पंढरपूर तालुक्यातील नारायण चिंचोली येथे ग्रामपंचायतीच्या सरपंच नर्मदा लक्ष्मण धनवडे यांच्या संकल्पनेतून ग्रामीण भागातील महिलांचे सक्षमीकरण करणे, अंधश्रद्धा अनिष्ट रूढी परंपरा यातून मुक्तता करणे, बालविवाह रोखाणे, महिलांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना करणे, मुलींचा जन्मदर वाढवण्यासाठी प्रयत्न करणे, महिलांचा ताणतणाव कमी करून आयुष्यमान वाढवणे यासाठी खेळ, गाणी, गप्पा,चर्चा, बोधकथा यांच्या माध्यमातून प्रबोधन करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्या व महिला कर्मचारी यांनी येणाऱ्या प्रत्येक महिलेचे स्वागत केले. प्रमुख मान्यवरांच्या हस्ते माता जिजाऊ, माता सावित्री, माता रमाई, माता अहिल्या यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येऊन या महान माते मातांचा गौरवोद्गार करण्यात आला. मुलींचा जन्मदर वाढवण्यासाठी श्री जन्माचे स्वागत म्हणून मुलीला जन्म देणाऱ्या मातेला बाळाचे संगोपन किट देऊन सन्मानित करण्यात आले.

आरोग्य विभागाकडून महिलांच्या आरोग्यांची तपासणी करण्यात आली. यामध्ये शुगर,बीपी, हिमोग्लोबिन, यांच्या तपासण्या करून योग्य मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी तालुका वैद्यकीय अधिकारी श्री. एकनाथ बोधले सर व प्राथमि क आरोग्य केंद्र तुंगत च्या वैद्यकीय अधिकारी डॉक्टर भानवसे मॅडम यांनी स्वच्छता, आरोग्य, व शुद्ध पाणी यातील महिलांचे योगदान, त्यावर करावयाची उपायोजना यावर व्याख्यान दिले. त्यानंतर महिलांचा ताणतणाव कमी करण्यासाठी पांडुरंग सह. साखर कारखान्याचे संचालक मा.श्री.लक्ष्मण तात्या धनवडे यांच्या मार्गदर्शनाखाली खेळ, गप्पा, गोष्टी, गाणी यांचा बहारदार कार्यक्रम होम मिनिस्टर खेळ पैठणीचा या कार्यक्रमाच्या आयोजन केले. या कार्यक्रमाचे सादरीकरण उत्कृष्ट संवाद तज्ञ शहाजी देशमुख यांनी केले. यावेळी प्रथम बक्षीस - पैठणी, द्वितीय बक्षीस - नथ, तृतीय बक्षीस - कुक्कर व इतर उत्तेजनार्थ बक्षीसे सूर्यनारायण मेडिकल स्टोअर्स व संभाजी भोसले यांच्या वतीने देण्यात आली. त्यानंतर ग्रामपंचायतच्या वतीने अल्पोपहार देण्यात आला.अशाप्रकारे अनोखे उपक्रम घेऊन महिलांना भयमुक्त, सक्षम व प्रभावशाली बनवण्यासाठी ग्रामपंचायत ने केलेल्या कार्यक्रमाचे महिलांनी कौतुक केले. हा कार्यक्रमसाठी डॉक्टर स्वप्नाली शिंदे, आरोग्य सेविका त्रिशाला जाधव, अशा सेविका पुष्पाताई हाडमोडे, उमा बनसोडे, लक्ष्मी हाडमोडे शिक्षिका बामणे मॅडम, अंजु करळे मस्के, उत्पात मॅडम, मेघा घाडगे, अंगणवाडी ताई शांता बनसोडे, अन्नपूर्णा भडकुंबे, उषा कोले, सुजाता जाडकर ,प्रितम नलवडे, शीतल घाडगे, शोभा आहेर, रुपाली गुंड, यांनी परिश्रम घेतले.

